महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड -अलिबाग
आपत्ती व्यवस्थापन विभाग, सामान्य शाखा
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, जि.रायगड
दुरध्वनी क्र. :- ०२१४१-२२२०९७/२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र.:- ०२१४१-२२७४५१/२२२०२५
ईमेल: collector_raigad@maharashtra.gov.in / rdcraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/२०२० दि.०४/०४/२०२०

**तात्काळ**

प्रति,
जिल्हा शल्यचिकत्सक,
रायगड अलिबाग

**विषय:- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना</u>
उपजिल्हा रुग्णालय पनवेल करिता वार्ड बॉय व परिचारीका उपलब्ध करणेकरीता.**

संदर्भ:-१.या कार्यालयाचे पत्र क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना/प्रतिबंधात्मक उपाय/२०२० दिनांक २७/०३/२०२० रोजीचे.
२.उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे, यांचेकडील पत्र क्र.जा.क्र. कक्ष-३ड/कोरोना/९३९८९४०० दिनांक २८/०३/२०२० रोजीचे.

उपरोक्त संदर्भिय अ.क्र १ मध्ये नमुद केलेल्या पत्रान्वये उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे कोरोना बाधीत रुग्णांवर तातडीने उपचार करणेसाठी १२० खाटांचे विलगीकरण कक्ष (Isolation Center) उभारले जात असून त्यासाठी 40 वार्ड बॉय व 40 नर्सेस इतका अतिरिक्त कर्मचारी वर्ग तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने संदर्भ अ.क्र 2 मध्ये नमुद केलेल्या पत्रान्वये उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे यांनी सद्यस्थितीत रायगड जिल्ह्यातील सर्व रुग्णालयामध्ये मिळून 240 अधिपरिकचारीका व 171 गट-ड कर्मचारी कार्यरत आहेत. त्यानुसार त्यांनी आपल्या अधिनस्त सर्व 50 खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय येथील रुग्णसेवेकरिता आवश्यक कर्मचारी ठेवून उर्वरित कर्मचारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे वर्ग करण्याबाबत कळविले आहे.

तरी त्याप्रमाणे आपण पनवेल जवळील इतर उपजिल्हा रुग्णालय व ग्रामिण रुग्णालय येथील कर्मचारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे आवश्यकते नुसार उपलब्ध/वर्ग करण्याची तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सोबत उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ ठाणे यांचेकडील संदर्भीय पत्राची प्रत जोडली आहे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : आयुक्त महानगरपालिका पनवेल यांसकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner